Pune Police

# प्रेसनोट दि. १३/०६/२०१७

## प्रसिध्द जेष्ठ शास्त्रीय संगीत गायीका तसेच सन १९९० मध्ये पद्मश्री, सन २००२ मध्ये पद्मभुषण व इतर विवीध प्रकारच्या पुरस्काराने सन्मानित केलेल्या श्रीमती डॉ. प्रभा अत्रे यांच्या घरातून चोरीस गेलेला किमती ऐवज ४८ तासाचे आत युनिट १ गुन्हे शाखेच्या टिमला हस्तगत करण्यास आले यश.

दि. १०/६/२०१७ रोजी पहाटे ०४ वाजणेचे सुमारास प्रसिध्द जेष्ठ शास्त्रीय संगीत गायीका श्रीमती डॉ. प्रभा अत्रे यांचे रहाते घरातून महागडे ०३ मोबाईल, हार्डडिस्क ०१, व इतर ॲसेसरीज असा एकुण १,०६,५००/- रु. किमतीचा मुद्देमाल चोरीस गेला होता म्हणून त्याबाबत डेक्कन पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १४४/२०१७ भादविक. ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, युनिट १ करीत असतांना पो.ना. श्रीकांत वाघवले व इरफान मोमीन यांना त्यांचे बातमी दारामार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्हयातील इसम हा शिवाजीनगर येथील मंगला थिएटर समोरील शिवाजी पुलावर त्याचे जवळील उपरोक्त नमुद मुद्देमालाची विक्री करणेसाठी येणार असलेबाबत बातमी मिळाली होती. त्याप्रमाणे गुन्हे शाखा युनिट १ कडील व.पो.निरी. श्री. नितीन भोसले पाटील यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई करून सदर ठिकाणी छापा मारून २२६ मंगळवार पेठ, पुणे येथील एका विधीसंघर्षीत बालकास ताब्यात घेण्यात आले. त्याचे जवळील प्लॅस्टीकच्या लाल पांढऱ्या रंगाच्या कॅरीबॅगची तपासणी केली असता, त्यामध्ये उपरोक्त नमुद गुन्हयातील मुद्देमाल मिळून आला असून त्याने स्वतःच वरील गुन्हा केलेबाबत सांगीतले आहे.

सदर विधीसंघर्षीत बालकावर यापूर्वी तो १२ वर्षाचा असतांना लष्कर पोलीस ठाणे येथे वाहन चोरीचा गुन्हा नोंद आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त सो., गुन्हे, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त सो., गुन्हे. श्री सुरेश भोसले, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पो उप निरी. दिनेश पाटील, पो.ना. श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, पो.हवा रिजवान जिनेडी, तुषार खडके, सुधाकर माने, स.पो.फौज. रविंद्र कदम, संभाजी भोईटे, कैलास गिरी, सुरेश उगले, पो.हवा. प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, उमेश काटे, विजय झगडे, अशोक माने, सुभाष पिंगळे, गजानन सोनुने, प्रशांत गायकवाड, मोहन येलपले, यांनी केली आहे.










गुन्हे शाखा,
युनिट-१,पुणे
शहरची कामगिरी